महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/५२

**पत्रकार टिपणी**

**उरण वायु विद्युत केंद्रातून वीज निर्मिती सुरु राहणार - महानिर्मिती**
**स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीची सकारात्मक भुमिका**

उरण तहसिल कार्यालय येथे दि. १० मे २०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने महानिर्मितीने लेखी स्वरुपात जाहीर केलेल्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर आता माजी खासदार श्री. दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीनेही महानिर्मितीस सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने घेतलेल्या आंदोलनाच्या भूमिकेवर महानिर्मितीने ही समस्या चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याचे आवाहन संबंधितांना केले होते, त्यानुसार उरण येथील सदर बैठकीस प्रकल्पग्रस्तांचे स्थानिक प्रतिनिधी, प्रांत अधिकारी श्रीमती. सुषमा परब, व. पोलिस निरीक्षक श्री. कोठावळे, तसेच महानिर्मितीतर्फे मुख्यालयाचे वरिष्ठ अधिकारी व स्थानिक अधिकारी उपस्थित होते.

महानिर्मितीच्या भूमिकेनुसार, कंपनीने आजवर प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत नेहमीच सहकार्याचे व सहानुभूतीचे धोरण राबविल्याचा बैठकीत पुनरुच्चार करण्यात आला आहे. उरण परिसरातील १९९ प्रकल्पग्रस्तांना आत्तापर्यंत महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले आहे. तसेच आगामी काळात साधारणत: नोव्हेंबर-डिसेंबर २०१० मध्ये कारागीर पदासाठीच्या भरतीप्रक्रियेत देखील महानिर्मितीच्या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

तसेच परिचारिका, निम्नस्तर लिपिक, व औषध निर्माता यांसारख्या पदांवरदेखील शासकीय नियमांच्या अधीन राहून अन्य अतांत्रिक प्रकल्पग्रस्तांना आगामी भरती प्रक्रियेत प्राधान्य देण्यात येणार आहे. याशिवाय, मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्कीमअंतर्गत ५वी उत्तीर्ण प्रकल्पग्रस्त उमेदवारांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षित करुन त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्याइतपत सक्षम करण्यासाठी देखील महानिर्मिती प्रयत्नशील राहील, असे कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे शिकाऊ उमेदवार आणि कंत्राटी कामगार यांचेबाबतीतील महानिर्मितीची भुमिका सदर बैठकीत स्पष्ट करण्यात आली. जाहिरात क्र. तांत्रिक/०५/२००९ नुसार, नुकत्याच झालेल्या १२२७ कारागीर - क पदांच्या भरतीत जास्तीत जास्त अप्रेंटिस उमेदवारांना महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले आहे. तसेच कंत्राटी कामगारांनादेखील महानिर्मितीच्या मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्कीमअंतर्गत प्रशिक्षित करुन त्यांना त्यायोगे कुशल कामगार म्हणून दर्जावाढ प्राप्त होऊ शकेल, असे कंपनीतर्फे कळविण्यात येत आहे.

उरण वायु विद्युत केंद्राची वीज निर्मिती खंडित होऊ नये, यास्तव चर्चेच्या माध्यमातून या प्रश्नावर सन्माननीय तोडगा काढण्यासाठी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीतर्फे श्री. गोपाळ पाटील व श्री. विजय पाटील यांनी मोलाची भुमिका बजावली.

---

दिनांक : १३/०५/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत तातडीने प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**